# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 10 April 2025
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – १० एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा भारताच्या ताब्यात
- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या आणि परवा रायगड तसंच मुंबई दौऱ्यावर
- एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती
- शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांचा विविध संघटनांशी संवाद

आणि

- जैन धर्माचे २४वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज सर्वत्र भक्तीभावाने साजरी

****

२६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी तहव्वूर राणा भारताच्या ताब्यात आला आहे. राष्ट्रीय तपास संस्थेच्या पथकानं प्रत्यापर्णाची प्रक्रिया पूर्ण करून आज त्याला दिल्लीत आणलं. राणाचं प्रत्यार्पण हे केंद्र सरकारच्या धोरणात्मक प्रयत्नांचं मोठं यश असल्याची प्रतिक्रिया केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिली आहे. ते म्हणाले –

**बाईट – केंद्रीय गृहमंत्री अमित शहा**

२००८ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातला आरोपी असलेल्या तहव्वूर राणाच्या खटल्याशी संबंधित कागदपत्रं दिल्ली न्यायालयाकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. यासंदर्भात मिळालेल्या निर्देशानुसार मुंबईतल्या संबंधित न्यायालयानं ही कागदपत्रं दिल्ली न्यायालयाकडे सादर केली.

दरम्यान याप्रकरणी सरकारची बाजू न्यायालयात मांडण्यासाठी केंद्र सरकारनं नरेंदर मान यांची विशेष सरकारी वकील म्हणून नेमणूक केली आहे. तीन वर्षांसाठी ही नियुक्ती असेल, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उद्या आणि परवा म्हणजे ११ आणि १२ एप्रिलला महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. उद्या संध्याकाळी आठ वाजता त्यांचं पुण्यात आगमन होईल. परवा सकाळी रायगड जिल्ह्यात पाचाड इथं राजमाता जिजाऊ यांच्या तर रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीचं दर्शन घेऊन, तिथल्या कार्यक्रमात सहभागी होतील. त्याच दिवशी संध्याकाळी साडे पाच वाजता मुंबईत गुजराती साप्ताहिक पत्रिका चित्रलेखाच्या ७५व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला अमित शहा उपस्थित राहणार आहेत.

****

जागतिक होमिओपॅथी दिन आज साजरा केला जात आहे. होमिओपॅथी ही आरोग्य सेवेसाठी समग्र दृष्टिकोन ठेवणारी जगातील दुसरी – सर्वात मोठी वैद्यकीय प्रणाली आहे. केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या मते, देशात १० कोटींहून अधिक लोक आरोग्याच्या गरजांसाठी होमिओपॅथीवर विश्वास ठेवतात. सध्या, देशात तीन लाख ४५ हजार नोंदणीकृत होमिओपॅथी डॉक्टर, २७७ रुग्णालयं, आठ हजारांहून अधिक दवाखाने आणि २७७ शैक्षणिक संस्था आहेत.

दरम्यान होमिओपॅथीचा उगम जरी जर्मनीत झाला असला तरी त्याच्या प्रचार प्रसारात भारताने मोठी भूमिका पार पाडल्याचं केंद्रीय आयुष तसंच कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी म्हटलं आहे. ते आज गांधीनगर इथं एका कार्यक्रमानंतर बोलत होते. यंदाच्या योगदिन सोहळ्याची विपरित गणना सुरू असून, याअंतर्गत नाशिक इथंही कार्यक्रम होणार असल्याची माहिती जाधव यांनी दिली, ते म्हणाले –

**बाईट – केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव**

****

राज्य सरकारने सुरू केलेल्या आरोग्य यज्ञाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असल्याचं, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज सोलापूर जिल्ह्यात सांगोला इथं महाआरोग्य शिबीरात बोलत होते. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी काळजी घेण्याचं आवाहन शिंदे यांनी केलं. ते म्हणाले –

## बाईट – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दरम्यान, सांगोला इथं भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण शिंदे यांच्या हस्ते करण्यात आलं. आपल्या या आभार दौऱ्यात सांगोला इथं जाहीर सभेलाही शिंदे यांनी संबोधित केलं.

****

राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या अध्यक्षपदी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते एसटी महामंडळाचे २६ वे अध्यक्ष आहेत. एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करून प्रवाशांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याचं सरनाईक यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान, पालघरमध्ये लवकरच नवं प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्यात येईल, अशी घोषणाही सरनाईक यांनी केली आहे.

****

शासनाच्या शंभर दिवसाच्या कार्यक्रमा अंतर्गत छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज विविध कामगार संघटना, जिल्हा व्यापारी संघटनांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. या बैठकीत सहायक कामगार आयुक्त युवराज पडीयाल, माथाडी मंडळाचे अधिकारी उपस्थित होते. औद्योगिक क्षेत्रामध्ये कामगारांवर होणारा अन्याय, कंत्राटी कामगाराचं किमान वेतन, बोनस याबद्दल या बैठकीत चर्चा करण्यात आली. व्यापाऱ्यांना वाहनं उभी करण्यासाठी वाहन टर्मिनलसाठी जागा मिळावी, दिवसा कमी रहदारीच्या वेळेत मालवाहतूक वाहनांना मोंढा परिसरात प्रवेश मिळावा, अशी मागणी व्यापारी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

****

जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज साजरी होत आहे.

भगवान महावीर यांचं जन्मस्थान असलेल्या बिहारमधल्या वैशाली जिल्ह्यातल्या कुंडलपूरमध्ये शोभायात्रा, मस्तकाभिषेक आणि इतर धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत नालंदा इथं पावापुरी जैन मंदिरात जैन भाविक मोठ्या संख्येनं पूजाअर्चनेत सहभागी झाले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी जनतेला महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या वतीनं महावीर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. या निमित्ताने जैन बांधवाच्या वतीनं शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. जैन मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आणि महाप्रसादासह सामाजिक उपक्रमही राबवण्यात आले.

नांदेड इथं भगवान महावीर जयंतीनिमित्त शहरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या यात्रेत महिलांचा लक्षणीय सहभाग होता.

जालना इथं भगवान महावीर यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम पार पडले. यानिमित्त शहरातून काढण्यात आलेल्या शोभायात्रेत जैन समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. गुरुगणेश तपोधाममध्ये आरोग्य तपासणी आणि रक्तदान शिबीरही घेण्यात आलं. भोकरदन शहरातूनही महावीर जयंतीनिमित्त भव्य शोभयात्रा काढण्यात आली.

****

नाशिक जिल्ह्यातल्या वणी इथल्या सप्तशृंग गडावर आज हजारो भाविकांनी चैत्रोत्सवानिमित्त हजेरी लावली. पालखी, दिंडी आणि पदयात्रेच्या माध्यमातून राज्यातल्या कानाकोपऱ्यातून भाविक दाखल होत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

जालना जिल्ह्यातल्या बदनापूर तालुक्यातल्या अकोला गावात गोठ्यांना आग लागल्याची घटना आज दुपारी घडली. आगीच्या या घटनेत सात गोठे, जनावरांसाठी साठवलेला चारा आणि इतर साहित्य भस्मसात झालं. अग्निशमन दलासह ग्रामस्थांनी शर्थीचे प्रयत्न करत या आगीवर नियंत्रण मिळवल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

पोषण पंधरवड्याला आजपासून सुरुवात झाली आहे. मुंबईतल्या वडाळा इथं बाल संगोपन आणि बालशिक्षण विभागाच्या वतीने यानिमित्त ३ ते ६ वर्षांच्या मुलांच्या पोषण आहाराचं महत्त्व समजावून सांगण्यात आलं. निरोगी जीवनशैलीसंर्भात अंगणवाड्यांमधे सेविकांकडून जनजागृती केली जाणार असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे

****

परभणी जिल्ह्यातल्या सेलू इथं होमिओपॅथी दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त आरोग्य शिबिराच्या माध्यमातून मोफत आरोग्य तपासणी आणि औषधी वाटप करण्यात आलं. नागरिकांचा याला चांगला प्रतिसाद मिळाला.

****

भारतीय महिला हॉकी संघ २६ एप्रिल ते ४ मे या कालावधीत पाच सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. २६ आणि २७ एप्रिल रोजी ऑस्ट्रेलिया अ संघाविरुद्ध सलग दोन सामने खेळले जाणार आहेत. त्यानंतर १, ३ आणि ४ मे रोजी ऑस्ट्रेलियाच्या वरिष्ठ संघाविरुद्ध तीन लढती होतील. सर्व सामने पर्थ इथल्या हॉकी मैदानावर खेळले जाणार आहेत.

****

चीनच्या निंगबो इथं सुरू असलेल्या आशियाई अजिंक्यपद बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या ध्रुव कपिला आणि तनिषा क्रॅस्टो यांनी मिश्र दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आज झालेल्या उप–उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात या भारतीय जोडीने चायनीज तैपेईच्या जोडीचा १२–२१, २१–१६, २१–१८ असा पराभव केला.

****

हवामान

राज्यात आज सर्वाधिक ४३ पूर्णांक आठ अंश सेल्सिअस तापमान जळगाव इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात धाराशिव इथं ३९ पूर्णांक आठ अंश, छत्रपती संभाजीनगर इथं ४२ पूर्णांक पाच तर परभणी इथं ४० पूर्णांक नऊ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

****